मसुदा
क्र. ११/२०१५-१६

गोपनीय
व्यवस्थापन परिषद

## मुंबई विद्यापीठ

व्यवस्थापन परिषदेची सभा *बुधवार, दिनांक १३ एप्रिल,२०१६ रोजी सायंकाळी ६.००* वाजता सर फिरोजशहा मेहता व्यवस्थापन परिषदेचे दालन, विद्यापीठ इमारत, उत्तर विभाग, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२. येथे सुरू झाली. सभेमध्ये खालील नमूद केल्याप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

१. डॉ. संजय व्ही. देशमुख, (कुलगुरू)

२. श्री. सिध्दार्थ खरात (उपसचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग)

३. श्री. शैलेद्र देवळणकर (सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई विभाग)

४. डॉ. अनिल पाटील, (संचालक, बी.सी.यु.डी.)

श्री. अ.आ. फळणीकर, वित्त व लेखा अधिकारी हे कायम निमंत्रित म्हणून उपस्थित होते.

श्रध्दांजली:-

### श्री. उस्ताद अली अहमद हुसेन खॉ

प्राख्यात सनईवादक श्री उस्ताद अली अहमद हुसेन खॉ यांचे प्रदिर्घ आजारपणामुळे दिनांक १६ मार्च, २०१६ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७७ वर्षांचे होते.

### श्रीमती. आशा जोगळेकर

प्रसिध्द कथ्थक नृत्यांगना श्रीमती. आशा जोगळेकर यांचे वृध्दापकाळाने दिनांक १८ मार्च, २०१६ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८० वर्षांच्या होत्या.

तसेच मुंबई विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी जे या काळात निधन पावले त्यांनाही श्रंध्दाजली वाहण्यात आली.

बाब १: दिनांक ११ मार्च, २०१६ रोजी संपन्न झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचे इतिवृत्त मंजूर करणेबाबत.

ठराव : असा ठराव करण्यात आला की, दिनांक ११ मार्च, २०१६ रोजी संपन्न झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या इतिवृत्तास केलेल्या सुचनांना आधिन राहून मान्यता देण्यात आली.

ठराव : असा ठराव करण्यात आला की, माननीय केंद्रीय मंत्री, मानव संसाधन विकास मंत्रालय यांनी कुलगुरूंच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयाच्या अधीन राहून विद्यापीठाच्या कालिना कॅम्पसमध्ये १५० फुट उंचीचा आणि फोर्ट कॅम्पसमध्ये १०० फुट उंचीचा ध्वज बसवण्याच्या D.K. Flag Foundation यांच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. या पैकी विद्यापीठाच्या कलिना कॅम्पसमध्ये ध्वज बसविण्याकरिता सुमारे नऊ लाखाचा खर्च D.K. Flag Foundation तर्फे केला जाणार आहे.

च्याऐवजी असे वाचावे.

ठराव : असा ठराव करण्यात आला की, माननीय केंद्रीय मंत्री, मानव संसाधन विकास मंत्रालय यांनी कुलगुरूंच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयाच्या अधीन राहून विद्यापीठाच्या कालिना कॅम्पसमध्ये १५० फुट उंचीचा आणि फोर्ट कॅम्पसमध्ये १०० फुट उंचीचा ध्वज बसवण्याच्या D.K. Flag Foundation यांच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. या पैकी विद्यापीठाच्या कलिना कॅम्पसमध्ये ध्वज बसविण्याकरिता एकुण खर्चापैकी सुमारे नऊ लाखाचा खर्च D.K. Flag Foundation तर्फे केला जाणार आहे.

बाब २: महाराष्ट्र अकृषि विद्यापीठे आणि संलग्नित महाविद्यालयाचे प्रमाणसंहिता (शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या सेवा व शर्ती) नियमावली,१९८४ रद्द करून सामायिक परिनियम (Common Statute)
लागू होईपर्यंत शिक्षकेत्तर कर्मचा-यांची प्रकरणे विद्यापीठे/ सहसंचालक/ संचालक (उच्च शिक्षण/तंत्र शिक्षण ) यांनी यापुढ महाराष्ट्र नागरी सेवा नियमांतील तरतूदीनुसार हाताळणेबाबत.

ठराव : सदर बाब सखोल चर्चा करून पुढील बैठकीत ठेवण्यात यावी, असा ठराव करण्यात आला.

बाब ३: The Grievance of Shri Ghegadmal Ramesh Baburao of Ambedkar College of Commerce and Economics.

ठराव : चर्चेदरम्यान असे निदर्शनास आले की, दिनांक २८ जून, २०१२ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेमधील निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरीता खालीलप्रमाणे अडचणी येत आहेत :-

१) अनुदानित पदावर समावेश (Absorb) करावा किंवा विनाअनुदानित पदावर करावा याबाबत संदिग्धता आहे.

२) सदर पद वि.जा./भ.ज. (D.T/N.T) साठी राखीव आहे व तद्नंतरचे खुल्या प्रवर्गासाठी पद उपलब्ध आहे. मात्र सदर पदाची जाहिरात मजुंर नाही.

३) सेवेत सामावून घेण्यासाठी प्रचलित नियमाप्रमाणे नेमणूकीस मान्यता देणे अथवा विशेष बाब म्हणून सेवेत सामावून घ्यावे याबाबत स्पष्टता नाही.

४) नविन नियुक्ती करावी अथवा महाविद्यालयातील दिलेल्या नियुक्तीला अनुसरून सेवेत सामावून घ्यावे याबाबत ही स्पष्टता नाही.

५) महाराष्ट्र विद्यापीठ कायदा कलम 8 (1) (g) चे उल्लघन केल्याचे दिसून येते.

सर्व बाबींवर चर्चा झाल्यानंतर सर्वानुमते असा ठराव करण्यात आला की, दिनांक २८ जून, २०१२ रोजी व्यवस्थापन परिषदेमध्ये पारित झालेल्या ठरावामध्ये स्पष्टता नसल्याने प्रचलित नियमानुसार पुर्ण तपासणी करून श्री घेगडमल व महाविद्यालयाचे व्यवस्थापन, प्राचार्य तसेच विद्यापीठातील संबंधित विभागिय अधिकारी यांना व्यवस्थापन परिषदेपुढे सुनावणी देण्यात यावी व तोपर्यंत व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक २८ जून, २०१२ रोजीच्या ठरावाची अंमलबजावणी करण्यास स्थगिती देण्यात येत आहे.

बाब ४: मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार व्यवस्थापन परिषदेपुढे सुनावणी देण्याबाबत. (श्री. अनंत पिराजी कदम)

ठराव : असा ठराव करण्यात आला की, सदर बाब पुढील बैठकीत ठेवण्यात यावी.

बाब ५: घटक महाविद्यालये व संस्था कक्ष आणि अध्यापक नियुक्ती विभाग यांचे एकत्रित नामकरण करण्याबाबत.

ठराव : असा ठराव करण्यात आला की, घटक महाविद्यालये व संस्था कक्ष आणि अध्यापक नियुक्ती विभाग यांचे एकत्रित नामकरण करण्याबाबत ठरावास मान्यता देण्यात आली.

पुढे असाही ठराव करण्यात आला की, या विभागाचे "शिक्षक नियुक्ती व मान्यता विभाग" (Teaching Appointments & Approval Secction- TAAS) असे नामकरण करण्यात यावे.

बाब ६: मुंबई विद्यापीठात असलेल्या विविध विभागांच्या अध्यासनांवर कार्यरत असलेल्या अध्यापकांची कालमर्यादा तीन वर्षासाठी निश्चित करण्याबाबत.

ठराव : असा ठराव करण्यात आला की, मुंबई विद्यापीठात असलेल्या विविध विभागांच्या अध्यासनाची कालमर्यादा तीन वर्षासाठी निश्चित करण्याबाबत मान्यता देण्यात आली पुढील नेमणूका करण्याचे अधिकार पूर्वीच्या पध्दतीनुसार मा. कुलगुरूंना राहतील .

बाब ७: MMRDA च्या प्रस्तावित उड्डाणपुलाचा मार्ग निश्चित करण्यासाठी मुंबई विद्यापीठाशी चर्चा करण्याबाबत.

ठराव : असा ठराव करण्यात आला की, MMRDA च्या प्रस्तावित उड्डाणपुलाचा मार्ग निश्चित करण्यासाठी मुंबई विद्यापीठाशी चर्चा करण्याबाबतचा प्रस्ताव (MoU सह) रितसर सादर करून व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी पुढील बैठकीत सादर करावा.

बाब ८: To decide the functioning of Western Regional Centre (WRC) of Indian Council of Social Science Research" (ICSSR-WRC) centre at University of Mumbai

Resolution: Management Council observed that Advisory Committee of ICSSR-WRC, Mumbai as suggested by the Hon'ble Vice-Chancellor, Mumbai (who is also Chairman of ICSSR-WRC) was not sanctioned in toto particularly in terms of name of Director (out of 3 nomination) proposed by him. Further, also that ICSSR disbursed the funds for the financial year 2015-16 without the consent of Advisory Committee whose approval for such disbursement is mandatory (which is not in existence due to abovementioned reason). In a separate communication, ICSSR has observed that ICSSR-WRC, Mumbai has become defunct w.e.f. July 2015. In fact, this is because of non-approval of Advisory Committee whose names were recommended by Vice-Chancellor

In view of above facts, it is resolved that the Director, ICSSR-WRC otherwise who is a full-time faculty in the department of Economics be directed to continue her departmental work till further orders and also that vehicle provided to her to perform the function as Director be withdrawn. It is also further resolved that there shall be no activity for the current financial year 2016-17 for ICSSR-WRC. It has been further resolved that till the time of approval of the name of new Director of ICSSR-WRC as suggested by Vice-Chancellor is granted by ICSSR, New Delhi, there shall be no activity for current financial year 2016-17 for ICSSR-WRC, Mumbai and that the Chairman, ICSSR-WRC would take care of day-to-day matters of the ICSSR-WRC with assistance from other administrative staff of WRC of ICSSR.

बाब ९: दिनांक ९ फेब्रुवारी, २०१६ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेतील चर्चेनुसार २००९-१० या शैक्षणिक वर्षापासून रत्नागिरी उपकेंद्र येथे सुरू करण्यास मान्यता देलेले B.Sc. Aviation आणि त्यास संलग्न Comercial Pilot License हे अभ्यासक्रम २०१६-१७ पासून गरवारे व्यवसाय शिक्षण व विकास संस्था येथून सुरू करण्यासबंधी चर्चा करून निर्णय घेणेबाबत

ठराव : असा ठराव करण्यात आला की, सदर बाब ॲडव्हायझरी बोर्ड ऑफ गरवारे इन्स्टीटयुट ऑफ करिअर एज्युकेशन ॲन्ड डेव्हलपमेंट यांचेकडे दिनांक ९ फेब्रुवारी, २०१६ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या ठरावानुसार पुढील कार्यवाहीसाठी परत पाठविण्यात यावी आणि संचालक, गरवारे इन्स्टीटयुट ऑफ करिअर एज्युकेशन ॲन्ड डेव्हलपमेंट यांच्याकडून सदर उपक्रमाबाबत अधिक माहिती घेउन त्यांच्या मान्यतेबाबत पुढील बैठकीत निर्णय घेण्यात यावा.

बाब १०: “वर्ग-१ संवर्गातील” अधिकारी वर्गाला तसेच स्वेच्छानिवृत्ती स्विकारणा-या शिक्षकेत्तर कर्मचा-यांनाही विद्यापीठ प्रशासनामार्फत ५ ग्रॅम सोन्याचे वळे देण्याची बाब.

ठराव : असा ठराव करण्यात आला की, “वर्ग-१ संवर्गातील” अधिकारी वर्गाला तसेच स्वेच्छानिवृत्ती स्विकारणा-या सर्व शिक्षकेत्तर कर्मचा-यांनाही विद्यापीठ प्रशासनामार्फत ५ ग्रॅम सोन्याचे वळे देण्याच्या ठरावास मान्यता देण्यात आली.

बाब ११: वित्त व लेखा समितीच्या दिनांक २९ फेब्रुवारी, २०१६ रोजी तसेच ३० मार्च, २०१६ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त मंजूरी करीता.

ठराव : असा ठराव करण्यात आला की, वित्त व लेखा समितीच्या दिनांक २९ फेब्रुवारी, २०१६ रोजी तसेच ३० मार्च, २०१६ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्तास मंजूरी देण्यात आली.

बाब १२: Centre for Excellence in Basic Sciences (UN-DAE,CEBS) विभागाच्या निर्मितीच्यावेळी झालेल्या कराराबद्ल चर्चा करणे बाबत

ठराव : The matter of UM-DAE-CBS was deliberated at length and following observations were noted.

1. Concern over composition of Governing Council: None of the authorities/bodies constituted by the UM-DAE-CBS is headed by the Vice-Chancellor, University of Mumbai.

2. Occupancy of University Buildings by UM-DAE-CBS for their current academic & hostel activities: Presently the UM-DAE-CBS is housed in various spaces of University building. It has been observed that prefabricated sheds and spaces in and behind Annabhau Sathe Hostel which were given to UM-DAE-CBS is not yet vacated by them even after construction of their Hostel and other academic building is completed. It was resolved that the said spaces be taken over by University for allotment to its own Departments from June 2016.

3. Formation of Society: Though the then Management Council has consented to form society, the members of the Management Council expressed concern over the handing over of the land since after formation of the society as per the society bye laws it is required to transfer the land in the name of society which is not permissible by the Government.

बाब १३: Budget of Confucius Institute (Based on grants provided by government of P. R. China) at Mumbai University as proposed by Director, Confucius Institute for Approval

ठराव : Budget of Confucius Institute (Based on grants provided by government of P. R. China) at Mumbai University as proposed by Director, Confucius Institute for approval be accepted.

बाब १४: सन २०१२-१३ पासून प्रलंबित असलेल्या विद्यापीठाच्या लेखा परिक्षणा- संदर्भात चर्चा.

ठराव : असा ठराव करण्यात आला की, सन २०१२-१३ पासून प्रलंबित असलेल्या विद्यापीठाच्या लेखा परिक्षणा- संदर्भात चर्चा करून मान्यता देण्यात आली

## आयत्यावेळी अध्यक्षांच्या परवानगीने घेण्यात आलेल्या बाबी.

बाब १५: The proposal to modify the Tranctions of Business of the Grievance Committee framed by the Management Council in respect of administrative control of Grievance Cell given to Deputy Registrar, Concol section be given to any other Deputy Registrar or Assistant Registrar.

ठराव : असा ठराव करण्यात आला की, याबाबत निर्णय घेण्याचे अधिकार मा. कुलगुरूंना देण्यात आले.

बाब १६: मालमत्ता मुंबई विद्यापीठाच्या मालकीची असल्यामुळे मुंबई विद्यापीठाने मालमत्ता कर भरणे आवश्यक आहे. ऑल इंडिया टेनिस असोशिऐशन AITA या संस्थेने मालमत्ता करापोटी भरलेली रक्कम ऑल इंडिया टेनिस असोशिऐशन AITA या संस्थेस परत देण्यासाठी प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव सादर.

ठराव : असा ठराव करण्यात आला की, याबाबत मा. कुलगुरूंना अधिकार देण्यात येत असून सदर ची जागा परत मिळविण्यासाठी त्वरित आवश्यक ती कार्यवाही करावी.

बाब १७: रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड (R.I.L.)यांचेकडून मुंबई विद्यापीठाला डोनेशन घेण्याकरिता परवानगी देणेबाबत.

ठराव : असा ठराव करण्यात आला की, रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडकडून (R.I.L.) मुंबई विद्यापीठाला डोनेशन घेण्याकरिता परवानगी देण्यात आली.

कुलगुरू | कुलसचिव | संचालक, बी.सी.यु.डी. | उपकुलसचिव (प्राधिकरणे)